

# खोड

किरण कुलकर्णी

साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव **खोड**

प्रकार : मराठी भयकथा

लेखक : **किरण कुलकर्णी**

kulkarnikirank@gmail.com

9970166241

प्रकाशन : **ई साहित्य प्रतिष्ठान**

Mobile : +91 9869674820

Email – esahity@gmail.com

page : www.esahity.com

*e Sahity Pratishthan*
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*

- *विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध*
- *आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.*
- *हे ई पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा इतर कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.*
- *या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे पुनर्मुद्रण किंवा नाट्य, सिने रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे*

**©esahity Pratishthan 2012**



# अर्पणपत्रिका

कथारूपानेही माणसाच्या अंगावर काटा आणता येवू शकतो
आणि मेंदूलाही झिणझिण्या देता येतात,
हे स्वतःच्या  लिखाणातून ज्यांनी सिद्ध केले,
त्या **श्री. नारायण धारप**
यांना सादर अर्पण ...



साहित्य प्रतिष्ठान®

# प्रकरण १

“हॅलो…”

“हॅलोSSS… …”

“मि. मनोज बोलताय का?”

“हो, मनोज बोलतोय…”

“हां, मी आनंद बोलतोय, … “

“कोण आनंद?”

“…आनंद सोंगटे हो, मागल्या आठवड्यात आला होता ना राव माझ्याकडं, तामहीणी साइडला, … प्लॉट खरेदी करायचा होता तुम्हाला, काय विसरला का काय भाऊ?”

“अं .. हो हो आलं लक्षात… बोला आनंद भाऊ, जरा कामाच्या गडबडीत विसरून गेलो होतो एवढच…”

“बरं बरं, चालायचेच हे … तुमचं काम येगळं आणि आमचं येगळं…!”

“… सांगा आता, काही शोध लागला का? आहे का एखादा प्लॉट तिथे?…आणि …”

“…होय साहेब …त्यासाठीच अगदी फक्त तुम्हालाच सांगायला फोन केला … बाकी अजून कुणाला खबरच दिलेली नाही… तुम्हाला जसा पाहिजे होता तसा आहे… तामहीणी शेजारी, भिरा गावाजवळ …समोर तळ्याचे पाणी आहे… भरपूर झाडं आहेत …प्लों…“

“ए.एकच मिनिट हं… एकच मिनिट … मी माझ्या डेस्कवरून जरा बाहेर येतो…” मनोजनी त्याचा लॅपटॉप स्क्रीन बंद केला आणि शेजारी बसलेल्या मित्राला “आलोच…” असं म्हणून तो बाहेरच्या कोरीडोरमध्ये गेला. आणि … “ हं, बोला आता … कधी येवू बघायला…??”

“आता बघा… तुम्ही कधी पण याल हो… पण मला जरा बायकोच्या गावाला जत्रेला जावून येवू दे, मग मी पुढच्या आठवड्यात फोन करतो… फक्त मला चेक करायचं होतं की अजून तुमची पार्टी इंटेरेस्टेड आहे की नाही…”

“…बस काय भाऊ … त्या शिवाय का ओळख ठेवली ?… आता आम्हाला उगाच ताटकळत ठेवू नका.” प्रॉपर्टि एजेंटना पैशांची काळजी असते म्हणून मनोज म्हणाला “…आणि पैशांची काळजी करू नका. मी मागेच संगितले होते, प्रॉपर्टि चांगली असेल तर योग्य ती किमंत द्यायला मी केव्हाही तयार आहे… पण आता हे जत्रेचे वगैरे काही मधेच काढू नका…”

“…अहो साहेब, जरा घराकड पण लक्षं द्यावं लागते…, मी नाहीतर एक काम करतो… मी या शनिवारी तुम्हाला प्रॉपर्टि दाखवतो आणि मग जत्रेला जातो … तुम्ही काय बिझी नाही ना शनिवारी?”

“हां, हा प्लान मस्त आहे, आमची ट्रीप पण होईल आणि प्रॉपर्टि चेक पण करता येईल…. कुठे भेटूया मग शनिवारी आणि किती वाजता?

“..या की तामहीणी साइडला सकाळी दहा पर्यन्त, तुम्हाला काय लांब नाही हे गाव…मला फोन करा तामहीणी क्रॉस केला की…गावाच्या फाट्यावर येवून थांबतो…मग दाखवतो तुम्हाला आमचं झकास काम…”

“… मग ओके … बाकी सगळया गोष्टी मी प्रत्यक्ष प्रॉपर्टि पाहिल्यावरच विचारीन. थॅंक्स अ लॉट …”

“… हां हां थॅंक्स थॅंक्स…भेटू मग …”

मनोज एकदम खुश झाला होता, डेस्कवर येता येता त्याने मोबाइल नंबर स्टोअर केला. बऱ्याच वर्षांची मनोज आणि त्याच्या फॅमिलीची इच्छा होती की आपलं पण एक सेकंड होम असावं, आणि गणपति / दिवाळी / मे महिन्याच्या सुट्टीमद्धे आपण पण तिथे जावून निवांत राहावं. कुणाच्या अध्यात नको की मध्यात नको… आपल्याला वाटेल तेव्हा खुशाल कधीही तिथे जावून राहावं, कुणाची आडकाठी नको… बस्स!!!

कधी एकदा ही गोष्ट घरी आई, बाबा आणि अंजलीला सांगेन अस मनोजला झालं होतं. ही सेकंड होमची कल्पना अंजलीला – म्हणजे त्याच्या बायकोला – अगदी लग्नाच्या आधीपासून माहीत होती…आणि ती त्याला सपोर्ट पण करत होती… आई बाबांचा पण काहीच विरोध नव्हता….फक्त जागाच मिळत नव्हती आणि मिळाली तर मनासारखी पसंद पडत नव्हती …

पण या फोनमुळे तो प्रश्न पण सुटणार होता... अगदी अलगद... मनोज मनातून केव्हाच तामहीणीत पोहोचला होता... आपल्या सेकंड होम मध्ये...!



# प्रकरण २

ऑफिस मध्ये बरंच काम होतं तरी निघताना त्याने बँक बॅलेन्स चेक केला. सगळे इनकमिंग, आउटगोइंग कॅश आपल्या खर्चाला पुरेशी आहे की नाही हे तपासले...आणि मस्त पैकी शिटी घालत लॅपटॉप बॅगेत ठेवून “थर्सडे क्लोज्ड... आता फक्त फ्रायडे आहे मध्ये...” अशी स्वत:ची समजूत घालून मनोज ऐटीत आपल्या हिंजवाडीच्या ऑफिस मधून बाहेर पडला... पार्किंग मधून सँट्रो आरामात ड्राइव करून कोथरूडला घरी कधी आला ते त्याला कळलच नाही, एरवी जीवघेणा वाटणारा ट्रॅफिक जामचा त्रास आजच्या एका कॉलमुळे तो पूर्ण विसरून गेला होता.

सोसायटीच्या सेकंड फ्लोरवरच्या आपल्या फ्लॅट पर्यन्त तो कधी पोहोचला ते त्यालाही कळलं नाही...

टिंग टोंग... टिंग टोंग... टिंग टोंग...

टिंग टोंग... टिंग टोंग...

“अरे आले बाबा आले ... आले... कशाला एवढ्या वेळेला बेल वाजवतो, कुणास ठावूक?...” मनोजच्या आईने दरवाजा उघडला, “किती घाई?, पूर्ण घर डोक्यावर घेतलयस बेल वाजवून... काय झालं काय एकदम ?...हं ??”

“आई, अगं एका प्लॉट बद्दल माहिती मिळाली आहे आणि तुम्हाला कधी एकदा सांगीन असं झालं होतं ..बस बाकी काही नाही.. “ मनोज शूज काढत काढत बोलत होता, बाबा फक्त कान देवून ऐकत होते.. आईच्या हातातला पाण्याचा ग्लास एका दमात मोकळा करून त्यानं विचारलं “ अंजली नाही आली अजून?”

“आली आहे ... फ्रेश होतेय... अं.. तू पण फ्रेश हो आणि सगळ्यांना एकदमच सांग न... दमून आलायस किती लांबून...आणि ते जीवघेणं ट्रॅफिक... बघूनच जीव घाबरा होतो आणि

तुम्हाला तर त्या पानिपतात भाग घ्यायचा असतो... " आईची नेहेमीप्रमाणे कुरबुर सुरू झाली हे बघून मनोज जास्त काही न बोलता फ्रेश व्हायला गेला.

त्याचे बाबा त्याला फक्त बघत होते... तो दिसेनासा झाल्यावर आपल्या बायकोच्या बोलण्याकडे लक्ष न देता त्यांनी शांतपणे आपले डोळे बंद केले आणि आरामखुर्चीत शांत पडून राहिले...

...

फ्रेश झाल्यावर मनोजने प्लॉट संबंधी माहिती सांगितली आणि येत्या शनिवारी आपण सगळेच ट्रीपला जावू असा विचार मांडला...अंजली खुश झाली होती. आणि आई-बाबांनाही माहीत होतं मनोजच्या सेकंड होम च्या प्रेमाबद्दल त्यामुळे त्यांनी त्या दोघांना जायला काही आडकाठी केली नाही. पण बाबांची रेग्युलर मेडिकल टेस्ट करायची होती म्हणून त्या दोघांनी मनोजला नाराज न करता आपण येवू शकत नाही हे पटवून दिलं. अंजली आणि मनोज दोघेही बरेच दिवस कुठे बाहेर गेले नव्हते म्हणून ट्रीप ही एंजॉय करता येईल आणि प्लॉट ही बघता येईल असा प्लान करून उठले...

तेव्हा बाबा त्यांच्या नेहेमीच्या स्टाइलनी म्हणाले..."... जागा बघा, पण थोडी विचारपूस करा आजूबाजूला... कारण सगळ्या गोष्टी काही डोळ्यांनी दिसत नाहीत आणि कानांनी ऐकता येत नाहीत..."

मनोज म्हणाला "हो बाबा, मी चेक करतो ते... पेपर्स वगैरे सगळे मागवतो आणि आपल्या साने वकील काकांना दाखवतो... म्हणजे नेहेमीप्रमाणे टेंशन नाही...." ... मग अंजली आणि मनोज जेवायला किचन मध्ये निघून गेले...आईंनी आपलं आणि बाबांचं ताट करुन आणलं आणि टी व्ही बघत दोघेही जेवू लागले...

"...अहो दोघंही नोकरी करतात मोठ्या कंपनीत... तुम्हाला काय होतय इथे बसून सल्ले द्यायला... त्यांना पण काही काळजी असेलच की...आपण कशाला उगाच सल्ले द्यावेत... लहान आहेत का अजून...." आणि बरच काही आई पुटपुटत राहिल्या... बाबांनी नंतर मान डोलावली पण उत्तर दिलं नाही...

...

# प्रकरण ३

मनोज आणि अंजलीला शुक्रवार कधी आला आणि गेला ते कळलंच नाही. शनिवारी सकाळी दोघेही सँट्रो मधून ट्रीप एंजॉय करायला बाहेर पडले... जाताना त्यांनी आई बाबांना हॉस्पिटल मध्ये ड्रॉप केलं आणि परत जाताना रिक्षा वापरा म्हणून ठणकावून सांगितलं ... कारण मनोजला माहीत होतं की जुन्या खोडांची खोड कधी जात नाही...अगदी भर उन्हात सुद्धा दोघेही पायपिट करीत ते घरी गेले असते...

...

अंजलीने मग फायनॅन्स बद्दल विषय काढला..."अरे तू प्लॉट वगैरे सगळं म्हणतोयस, पण बजेट तुझ्याकडचे वापरायचे हं ... माझ्याकडचे सगळे आपल्या नेक्स्ट जनेरेशनसाठी ठेवले आहेत मी...माहीत आहे न तुला ते आपल्या प्लॅनिंग बद्दल...?"

"हो मॅडम ... लक्षात आहे सगळे माझ्या... आपल्या कंपनी बरोबर आपण आपल्या घरचेही फायनॅन्स प्लान करत आहात म्हणून मी आपला अत्यंत आभारी आहे... " मनोजने हसून प्रत्युत्तर दिलं.... आणि कार तामहिणी च्या वाटेला लागली... भिराच्या दिशेने ...

...

मुळशी डॅमला चक्कर मारणाऱ्या तामहिणीची मजा फक्त अनुभवता येते असं म्हणतात आणि ते मनोज आणि अंजली दोघेही मस्त अनुभवत होते. सकाळची वेळ असल्याने पूर्ण घाट - रस्ता, डॅमचं पाणी पाहता पाहता कसा पार झाला ते दोघांनाही कळलं नाही. तामहिणी घाटात असताना आनंदला फोन केला मनोजनी, तेव्हा भिरा गांव अगदी घाट ओलांडल्यावर 1-2 की.मीटर लांब आहे जास्त दूर नाही हे समजले, नाहीतर मनोजला कार ड्राइव करण्याचा इतका नाद होता की चांगला 10-20 की.मीटर तर तो आणखी पुढे गेला असता...

...

भिरा गावाच्या फाट्याला आनंद उभा होता, सँट्रो बघितल्याबरोबर त्याने जोराने हात हलवून मनोजला गाडी थांबवायला सांगितली...

"मनोजच ना?"

"हो हो, मीच तुम्हाला तामहिणी क्रॉस करताना फोन केला होता."

आत डोकावून आनंद म्हणाला "..नमस्कार वहिनी, बरं झालं तुम्ही आलात ते, नाहीतर तुमच्या पसंतीसाठी साहेबांना आणखी एकदा यावं लागलं असतं ..." अंजलीने फक्त शहरी हास्य दाखवून नमस्कार केला...

"...अजून किती लांब आहे प्लॉट? आणि तुम्ही गाडीतच या म्हणजे तिथे पर्यन्त जाता येईल..." असं म्हणून मनोजनी कारचा दरवाजा उघडला, आनंद एकदम खुशीत कारच्या मागच्या सीटवर जावून बसला आणि म्हणाला " ... हे अगदी जवळच... या फाट्यावरून घ्या आत... आणि या उजव्या साईडला सोडू नका ... आणि तुमच्या प्लॉट वरून तर हे तळयाचं पाणी लई भारी दिसतय... फक्त खुळयासारक बघत बसावं वाटतं..."

"...अजून आमचा व्हायचा आहे तो प्लॉट..."

"...तुम्हाला पसंद पडणार नाही असं होणारच नाही साहेब..."

"..बघूया, बघूया..."

...

प्लॉट समोर दिसणारं तळयाचं स्वच्छ निळंशार पाणी, बाजूची मन धुंद करणारी कंच हिरवाई, दंगा-गोंगाट नसणारी नीरव शांतता आणि आजूबाजूला अजिबात त्रास न देणारे शेजारी (खरंतर झाडांव्यतिरिक्त शेजारच नव्हता !...) या आणि (कदाचित) आनंदच्या "साहेब साहेब ..." वाल्या गोड बोलण्याने मनोजनी मनोमन हा प्लॉट पक्का केला होता... आणि मनातून त्याला तिथे छोटासा बंगलाच दिसू लागला... अंजलीला मनोजचा उतावळा स्वभाव माहीत होता, पण तिलाही हा एरिया मनापासून आवडत होता. यातून नंतर काही फसवफसवी होवू नये म्हणून तिनं प्रॉफेश्नल चेहेरा ठेवून आनंदला विचारले "...अं, पेपर्स सगळे बरोबर आहेत ना? आणि इथे आम्हाला घर बांधायला पर्मिशन मिळेल ना?..."

"...अहो मॅडम, पेपर्स सगळे ओके आहेत... आणि घरच काय पण अख्खी बिल्डिंग जरी बांधली तरी कुणाला काही प्रॉब्लेम नाही... हे घ्या सगळे पेपर्स..." अंजलीला आता मनातून

बरं वाटू लागलं होतं... तिनं त्या पेपर्सची बॅग कारमध्ये नेवून ठेवली... मनोज आणि आनंद प्लॉट मध्ये जावून गप्पा मारत होते, तेव्हा अंजली त्या प्लॉटचे आपल्या नजरेतून निरीक्षण करत होती...

प्लॉट फार मोठा नव्हता , पण फक्त एक खोली बांधली जाईल एवढा लहानही नव्हता... आरामात 2 बीएचके बंगलो आणि मागे-पुढे अंगण / कार पार्किंग होईल इतका पुरेसा होता...सगळ्या बाजूंनी मस्त पैकी झाडांची सावली कायम बंगल्यावर येणार होती...झाडांची संख्याही खूप होती, आणि आजूबाजूला तर जंगलासारखीच हिरवाई होती... बघता बघता तिचं लक्ष प्लॉटच्या रस्त्याकडेच्या एका जागेला गेलं, तिला असं वाटलं की तिथे पूर्वी एखादं झाड असणार आहे, पण आता ती जागा रिकामी होती – अगदी भुईसपाट, नावाला मात्र तिथं एक दोन-तीन हात लांब व्यासाचं  आणि अगदी एक दोन इंच उंच असलेलं एक खोड मात्र होतं ...

“आनंद भाऊ, या प्लॉट मधली बाकीची झाडं एकदम मस्त बहरली आहेत, पण रस्त्याकडचे हे झाड मात्र अगदी खोडापासून कापून काढलं आहे... तुम्हाला काय कारण माहीत आहे का?” – अंजलीची कोर्ट केस सुरू झाली – मनोजच्या डोक्यात एक मुंगी चावली – आता आपण थोडा आनंदला सहारा दिला पाहिजे नाहीतर, हा मस्त प्लॉट ही या एका फडतुस रिकाम्या खोडासाठी हातातून जाणार...

“मॅडम, लोकांची नजर चांगली असते का? मला सांगा... जर गावातल्या (किंवा बाहेरच्या !) कुणाला लाकूडफाटा लागला, तर कुणी एवढ्या रोडसाईडला आणि आजूबाजूला वस्ती नसताना उभ्या असणाऱ्या झाडांना तोडायचे सोडून तो माणूस लाकूडफाटा विकत आणलं का?... आणि इथं मालकांनी तट बी नाही उभा केला ...मग काय जे गावाचं ते आपलं आणि आपलं ते गावाचं, अशी म्हणच आहे ... मग काय तोडला असंल कुणीतरी... आणि मालक काय दररोज येवून झाडं मोजणार नाहीत हे सगळ्यांना ठावूक असतं...”

अंजलीला ते पटल्यासारखे वाटले, मनोज मनातून हुश्श झाला...

त्या जागेला येवून त्याने चेक केले तर खूप मोठं असावं असं वाटणारे झाड अगदी खोडासकट गायब होते, पण त्याच्या आजूबाजूला छोटीशी वेलांची पाने डोकावत होती.... आणि ज्याने कुणी हे झाड तोडले असेल त्याला दोन शिव्याही दिल्या (मनातून) .... त्याला निसर्गाचे कौतुक वाटले...झाड नाही, निदान वेल तरी टिकेल... आणि ती वेल ही त्या पूर्ण खोडाला गुंडाळून वर आली होती... नंतर अंजलीने बाकीची बरीच विचारपूस केली... आणि मनोजला ग्रीन सिग्नल देणारा प्रश्न आनंदला केला..

“...मालकांना कधी भेटायचं ह्या व्यवहाराबाबत...? आणि ते गावात असतात की कुठे पुण्या-मुंबईत?...”

आनंदला आजचा वेळ सत्कारणी लागला असं वाटलं...आणि त्यानं मालकांची गावातच शेती वाडी असल्याच सांगितलं ... आणि दोघांनाही वेळ असेल तर ते आज भेटू शकतात असाही सांगितलं... वेळ तर होताच आणि हे काम जितक्या लवकर होईल तितकं आपल्यालाही बरं - असं मनोजला (त्याच्या स्वभावाप्रमाणे) वाटत होतं... मग त्याने अंजली बरोबर चर्चा केली आणि मालकांना भेटण्यासाठी आनंदला घेवून ते निघाले... जाताना गाडीच्या मागे सोडलेल्या वाऱ्यामुळे असेल (कदाचित !) पण ती वेलीची पानं सळसळली ... अगदी आनंदानं (किंवा दु:खानही असेल )सळसळली बराच वेळ नंतरही ... बाकीची झाडं मात्र शांत आणि स्तब्ध होती... आळी मिळी गुप चिळी सारखी....शुशूशू ....

...



# प्रकरण ४

संध्याकाळी साने काकांबरोबर गप्पा मारताना मनोजच्या आई-बाबांना लक्षात आलं होतं की मनोजला तो एरिया, तो प्लॉट, तिथला निसर्ग हे सगळं किती आवडलं आहे ते... फक्त मनोजलाच नाही तर अंजलीला सुद्धा ... त्यामुळं त्यांना खूपच आनंद वाटत होता आणि या कागद्पत्रांमुळे यांच्या सेकंड होमला आणखी विलंब नको असं त्यांच्या मनात येत होतं ...

सान्यांनी सगळे पेपर्स दोनदा चेक केले अगदी अक्षर अन अक्षर... म्हणाले "... मला तरी या पेपर्स मध्ये काही प्रॉब्लेम्स वाटत नाहीत, तरी 2-3 दिवसानी मी ऑफिस मधून कन्फर्म केल्याशिवाय व्यवहार करू नका म्हणजे झालं...आणि एक सहज गम्मत म्हणून सांगतो, या पेपर्स मध्ये शंभर दीडशे वर्षांपूर्वीचे एक जुनं खरेदीपत्र पण आहे, त्या काळची भाषा मला फार आवडते... तर एका पानावर काय लिहिलं आहे माहीत आहे का??? ... अरे घाबरायचं कारण नाही काही...पण माणसांच्या वृत्ती आणि प्रवृत्ती किती सजग असतात पहा... तर यात लिहिलय की – 'इत:पर या जमिनीचे वरील आणि खालील, स्थावर आणि जंगम, भूत आणि अभूत गोष्टींसहित सर्व मालमत्ता आपले आणि आपले वंशावळीचे नावे लिहून दिल्हे असे, की याबाबतीतला खुलासा मागणेस आपले पैकी कोणही आमचे पैकी कोणासही विचारो नये'... - हा इतका पारदर्शक व्यवहार आजच्या काळात कुठे पाहता येत नाही म्हणून आपलं तुम्हाला वाचून दाखवलं झालं..." सगळ्यांनी त्यांना मनापासून दाद दिली .... नंतर व्यवहाराची बोलणी अगदी थोडक्यात समजावून साने आपल्या घरी गेले... आणि मनोज- अंजली पुन्हा एकदा मनातून भिरा गावात त्यांच्या (होणाऱ्या) प्लॉट मध्ये पोहोचले सुद्धा ...

...

सानेकाकांचा निरोप आल्यानंतर मनोज, अंजली, आई, बाबा, सानेकाका सगळे भिराला जावून खरेदीखत पूर्ण करून आले. जागा मालकांची बक्कळ जागा असल्यानं त्यांना या

टिचभर जागेचं काही दू:ख नव्हतं... फक्त वय होत आलेलं आणि मुलांना मोठ्या शहरांमध्ये पैसा लागतो म्हणून जमिनीचा तुकडा विकून टाकला, एवढाच त्यांचा या व्यवहाराशी संबंध... 'नाहीतरी आजकाल आपलीच मुळं आपल्याला शोधावी लागतात'

सानेकाकांना पण हा एरिया आणि निसर्ग इतका आवडला की त्यांनी पण आनंदला असाच एक प्लॉट शोधायला सांगितला...

...

दोन चार महिन्यात कमीतकमी एक मोठा हॉल आणि टोइलेट्स बांधून चांगली पंधरा दिवसांची सुट्टी काढून राहायला जायचा प्लान मनोज आणि अंजली करत होते. बाबांच्या गावचा ओळखीचा कॉन्ट्रॅक्टर बोलावून त्याला आर्किटेक्टकडचे घराचे डिजाइन देवून कामाची आगावू रक्कम ही दिली. त्यानेही आपल्या बिरादरीतील चांगल्या माणसाला (गवंडी, सुतार – ऑल इन वन फॅमिली !) त्याच्या कुटुंबासह तिथे जावून, राहून, काम पूर्ण करण्याची ऑर्डर दिली...  बघता बघता महत्वाच्या सरकारी कागद्पत्रांबरोबर (आनंदची मदत झाली पुन्हा!) जागाही ताब्यात घेवून मनोजने जीवबा आणि मंडळीना (तीच ऑल इन वन फॅमिली ) भिरा गावातल्या प्लॉटमध्ये राहायला बोलावले...

...



# प्रकरण ५

जीवबा, थोरला मुलगा आणि सून बाई यांच्याबरोबर त्या प्लॉटमध्ये एका बाजूला मोठं झोपडं बांधून राहायला लागला, त्यासाठी जागेची साफसफाई करून घेतली गेली. घरच्या डिजाइन प्रमाणे आजूबाजूच्या कुठल्याच झाडांना हात सुद्धा लावला नाही.. एवढंच नव्हे तर प्लॉटच्या मध्यभागी असणाऱ्याही झाडांना न तोडता मनोजला तिथे घर बांधायचे होते आणि डिजाइन ही मुद्दाम त्याच प्रमाणे बनवले होते. मनोज आणि अंजली दोघांनाही जास्त वेळ देता येत नव्हता म्हणून त्यांनी एका बैठकीतच जीवबाला त्या दोघांना नक्की काय हवं आहे ते सांगितलं...

...

प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली तेव्हा जीवबा आणि त्यांचा मुलगा – सुनील, दोघांनाही उसंत नव्हती. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या सगळया मालाची खरेदी भिरा आणि शेजारच्या गावातून करावी लागत होती... आणि सामाना बरोबर त्यांना मदतीचे आणखी हात ही हवे होते, तोही शोध चालूच होता, कारण 2-3 महिन्यात मोठी खोली आणि ऐसपैस अंगण तरी बनवायचे होते. त्याच पायावर नंतर बंगला उभा राहणार होता...

या सामाना बरोबर, सुनीलने त्याच्या घरासाठी लागणाऱ्या किराणा सामाना बरोबर दोन शेळयाही खरेदी केल्या होत्या... शनिवार – रविवारच्या विश्रांतीबरोबर पार्टी करण्यासाठी... !

त्यानं बाजारातून शेळ्या आणल्या आणल्या बायकोच्या ताब्यात दिल्या आणि सांगितलं "शेवंते ... बांद हितच झाडाला कुठंतरी या शेळया आणि फक्कड रस्सा कर रइवारी .... बाला पन आवडतोय की ...बाकी काय सामान लागणार आसलं तर हुद्याच सांग... नंतर घास खाताना टक्कूर फिरवू नगस..."... शेवंतानं मान डोलावली आणि झोपडीच्या पलीकडच

एका एका झाडाला शेळ्या वेगळ्या बांधून ठेवल्या...आणि ती चारा आणायला प्लॉटच्या बाहेर गेली. तो झोपडी मागे हात पाय धुवायला गेला. जीवबा अजून काही खरेदी करून भिरेच्या बाजारातून निघाला होता....एवढ्यात ....

... एवढ्यात बांधलेल्या एका शेळीची नजर शेजारच्या खोडावर पडलेल्या वेलीच्या हिरव्यागार पानांवर गेली... आणि त्या शेळीनं गुडघ्यात वाकून वेलीला तोंड लावायचा प्रयत्न केला ...अगदी एकच क्षण... त्या एका क्षणात (वारं नसतानाही) ती वेल खोडावरून पलीकडे उडाली... शेळीनं पुन्हा प्रयत्न केला त्या दिशेने, तर तिथून पुन्हा वेल अलीकडे उडी मारून आल्यासारखी वाटली...पण तिथं तर कुणीच नव्हतं (दुसऱ्या शेळीशिवाय) वेलीला हलवायला... असं दोन तीनदा झालं पण या झटपटीत एक-दोन पानं शेळीच्या तोंडाला लागलीच... आणि ती चघळतच उभी होती, तेवढ्यात शेवंतानं चारा आणून त्या दोघींच्या समोर थोडा थोडा टाकला आणि बाकीचा चारा  लांब जागेवर टाकून ती आपल्या खोपडात काम करायला निघून गेली...दोघी शेळ्या मग मनसोक्त चारा खाण्यात मग्न झाल्या... अगदी पुन्हा कधीही मिळणार नसल्यासारख्या .... ! पण थोड्याच वेळात त्या शेळ्या खूप अस्वस्थ वाटायला लागल्या, आपल्याच खुरांवर सारख्या उड्या मारत होत्या जणू काही त्या जमिनीवर पाय न ठेवण्याची धमकी दिल्यासारख्या...

...दिवस मावळला... पण  कुणासाठी तरी तो आता सुरू झाला होता. जीवबा खोपडा बाहेर बाजेवर घोरत होता, आतमध्ये सुनील आणि शेवंता बिनघोर झोपले होते... आणि शेळ्याही झोपल्या होत्या..किंवा असाव्यात... मध्यरात्रीच्या सुमारास, सगळं काही सामसुम असताना, त्या खोडावरच्या वेलीच्या आतली सुप्त शक्ति (जी संध्याकाळी वेलीला वाचवण्याचा प्रयत्न करत असावी, बहुधा तीच...) जागी झाली... कितीतरी वर्ष बंद असलेल्या एखाद्या कुलूपबंद कपाटातून किंवा कपड्यांच्या मोठ्या संदूकीतून एकदम कुबट वास यावा अगदी काही क्षण आणि त्या वेळेत आपण आपली सगळी इंद्रियं लुब्ध झाल्यामुळे काहीच हालचाल न करता स्तब्ध रहातो तसच तिथल्या खोडाच्या आसपास वातावरण झालं होतं ... त्या शक्तीने वेलीचा आता पूर्ण ताबा घेतला होता (कदाचित त्यानं कधी तिच्यापासून अलिप्तता घेतलीच नव्हती...) आणि लागणाऱ्या ताकदिनिशी ती वेल आता हळूहळू 'त्या' शेळीच्या दिशेने सरकत होती... हळू हळू हळू हळू ... आता तिच्या जमिनी वरच्या उंचीचा पूर्ण उपयोग करून ती शेळीच्या एक हात अंतरापर्यंत पोहोचली होती... आणि आवाज तर बिलकुल येत नव्हता कारण त्या वेलीने खोडाचा आधार घेतला होता आणि जमिनी वरुन अगदी सापासारखी सरपटत चालली होती...हळू हळू हळू हळू ... आता त्या निष्पाप प्राण्याच्या शरीरावर झेप घेण्याकरता थोडेच अंतर उरले होते, हे त्या शक्तीला जाणवले आणि त्या वेलीचा जमिनीखालचा भाग अगदी आवाज न करता मातीतून उखडून येवू लागला.. अगदी कुणाच्याही न कळत ... थोड्याच वेळात ती वेल आणि तिच्या दोन छोट्या फांद्या सावजाच्या तोंडापर्यंत पोहोचल्या होत्या. जमिनी खालून वर होणारी वेलीची

वाढ अजून थांबली नव्हती. त्या शक्तिनं आता सगळी वेल त्या शेळीच्या आजूबाजूला गोळा करून ठेवली... आणि कदाचित आजूबाजूचा अंदाज घेण्यासाठी एक क्षण थांबली... अगदी एकच क्षण... त्या वेळेला ती घटना पहाणाऱ्याला असं वाटावं की त्या शेळीच्या बाजूला वेलीचा खूप मोठा गुंता (अगदी मुळासहित झालेला गुंता) पडलेला आहे ... कदाचित तिच्या खाण्यासाठीच फक्त... पण दुसऱ्याच क्षणी तो पूर्ण गुंता शेळीच्या तोंडा भोवती जमा झाला आणि तिसऱ्या क्षणाला ... बस्स... लढाईतला अंतिम वार झाल्यानंतर जी शांतता पसरते ती तिथे आली होती... शेळीचं शरीर होतं पण आतली ताकद संपली होती कारण बाहेरच्या एका शक्तीने ती ताकद, तो जीव एका क्षणात मिटवून टाकला होता...आणि आता एका अजगराप्रमाणे ती वेल त्या शरीराला गुंडाळत चालली होती.. हळू ...हळू ... हळू ... हळू ....

... आवाज न होता ते वेलीत गुंडाळलेलं धुड आता हळू हळू जागेपासून हालत होतं ... आणि पुन्हा एकदा ती वेल जमिनी खालून वर येवू लागली...

थोड्याच वेळात तो गुंता त्या प्लॉटच्या बाहेर कच्चा रस्त्यावर आला आणि बेधडक रस्ता ओलांडून तळयाच्या दिशेने सरकला.... अजूनही वेल जमिनी खालून वर येतच होती... मग त्या गुंत्याने आता फक्त शेळीचं डोकं दोन फांद्यांनी पकडलं होत आणि गुंता मागे मोकळा होत होता आपोआप ...पण हळू हळू ...

'धप्प !!!' काठावरून तळयाच्या पाण्यात जोरात फेकलेल्या वस्तूचा फक्त आवाज झाला ... पण तो कुणालाच ऐकू गेला नाही, कारण ती वस्तु खूप अंतरावर जावून पाण्यात पडली होती... अगदी संपूर्ण ताकद लावून ती वस्तु फेकली असावी कदाचित...

...

आता गुंता नव्हताच, होती ती फक्त खोडावर रेलून निजलेली वेल. निष्पाप...

...

# प्रकरण ६

सकाळपासून शेवंता त्या शेळीला शोधत होती पण तिचा मागमुसही नव्हता. सुनीलने गावाच्या नावाने दोन फक्कड शिव्या देवून मागे राहिलेली शेळी खोपडाशेजारीच बांधून टाकली... "बघतूच मी कोण माईचा लागून गेलाय त्यो माझ्या शेळ्या चोरायला...भो *** "

...त्यामुळं दुसरी शेळी सुटली ... पण काही दिवसांपूरती... पार्टी होईपर्यन्त ..!

...

त्या गोष्टीला 2 आठवडे होवून गेले, आता बांधकाम जोरात चालू होतं. दोन – चार गड्यांना रोजंदारीवर बोलावलं होतं. काही मजूर फिरतीचे होते त्यांना सुनीलनं आपल्या शेजारीच पाल टाकून रात्रीच्या निवाऱ्याची सोय केली होती.

सामानाची चोरी होवू नये म्हणून सुनीलनं रोजगारावर आलेल्या दोघांना – नंदू आणि पिराजी - प्लॉट भोवती दगडी तट बांधायचा प्लान समजावून सांगितला. त्याप्रमाणे दोघांना आखणी करून दिली, सामानाची जागा दाखवली आणि '...लवकर काम पूर्ण करायचं' म्हणून तंबी पण दिली...

आखणी करताना झाडांची तोडणी होणार नाही हेच सुनीलनं पक्क मनात धरून प्लॉटची साइज धरून आखणी केली होती... पण त्याला शेवटी ते रस्त्याकडेचं खोड मध्ये येत होतं. त्या खोडाला वगळून तट बांधला तर दिसताना तो व्यवस्थित चौकोनात बसत नव्हता, आणि त्या खोडाला तटाच्या आत घ्यावं तर प्लॉटमध्ये ती जागाच रिकामी दिसणार म्हणून मग सुनीलनं त्या दोघांना ते खोड उपटून काढायला सांगितलं, मुळासकट...

तेव्हापासून वातावरणात काही तरी भारल्यासारखं वाटत होतं... एखाद्या नाजुकशा संध्याकाळी मन उदास वाटावं तसं सकाळपासून वाटून राहिलं होतं ... कुणाचीतरी अस्वस्थता तिथं दाटून आली होती... ती अस्वस्थता किती वर्षांची (की युगांची ?) होती ते माहीत नव्हतं... पण जाणाऱ्या जीवाला मरण समोर दिसत असेल तर शेवटच्या जीवंत राहण्याच्या अनिर्बंध इच्छेने तो जीव शक्य असेल तेवढ्या ताकदीने तडफडतोच... आणि मग जीवन खेचून आणतो ...किंवा मरण तरी पत्करतोच ... मग त्यासाठी त्याला मरणाच्या खाईत लोटणाऱ्यांचे जीव जरी घ्यावे लागले तरी बेहत्तर... पण आपला जीव वाचलाच पाहिजे...

... पण चार – पाच दिवस नंदू आणि पिराजी त्या खोडाकडे आलेच नाहीत... त्यांनी बाकीचा तट बांधून पूर्ण करत आणला. दिवसागणिक तिथली अस्वस्थता आणि आकंठता वाढत होती... पण ती जाणवण्यासाठी लागणारी संवेदना आणि वेळ दोन्ही कुणापाशी नव्हती ...

... मग पुढच्या आठवड्यात दुपारनंतर पिराजीच्या खांद्यावर खोड उखडून काढायचं काम आलं आणि नंदू नंतर तिथं भिंत बांधून तट पुरा करणार होता... पिराजीच्या अंगावर ते काम टाकून सुनीलला सांगून संध्याकाळी नंदू आपल्या गावातल्या घरी पोहोचला... पण पिराजी तर फिरतीचा रोजगारी माणूस, त्याचं घर म्हणजे आता त्या प्लॉटवर टाकलेली पालच... त्यामुळे ते काम सोडून त्याला कुठं जाता येणार नव्हतं.

... 'खाड्ड ... खाड्ड ... खाड्ड ... ' खोडावरती कुदळीचे घाव बसत होते... त्याच्या भोवती गुरफटलेली वेल आता मातीच्या ढिगाऱ्याखाली लपली होती. त्याकडे पिराजीचे लक्षं नव्हते. पण खोड अगदी जंगली वाटत होते, कारण त्याला एक चरा पण पडला नव्हता. पाच-सहा घावानंतर कसं कुणास ठावूक पण पिराजीच्या पायाला काहीतरी जोरात टोचलं, त्याची कळ त्याच्या डोक्यापर्यंत गेली आणि तो "...आय ...आय आय .....य य य य य ..." असं ओरडत खाली पडला.

... ' तुला लेका, नंद्या नाही तर काम करायचं नव्हतं तर मला सांगायचं नव्ह का ...च्यायला येवड बोंबलून काम कशापाई थांबवायचं ??? ...' सुनीलनं त्याच्या पायाला झाडपाला लावताना आपली जीभ पूर्ण सैल सोडली. आणि बाकीच्या कामगारांना "... तुम्हाला काय कामं न्हाईत का? हित काय शोले लागलाय व्हय??? गूचपा केलाय त्यो? जावा ... कामं करा.... " असं बोलून पिटाळून लावलं. आणि आपणही पुढच्या कामाला निघून गेला... राहिला पिराजी एकटाच त्या पालात.. सुनीलला किंवा कुणालाच तो काही नंतर बोलू शकला नाही ... कारण त्याला असं वाटत होतं की या पायाच्या जखमेमुळे आपण विचार करण्याची किंवा बोलण्याची शक्ति गमावून बसलोय की काय ...फक्त या पालात पडून

रहावस वाटत होतं... नंतर त्याचे डोळे दिवसभरच्या श्रमाने (की जखमेतल्या विषाने ?) मिटून गेले... आणि तो ही निश्चिंत पडून राहिला, त्या वेलीसारखा ...

... रात्री सुनील त्याच्या पालात जेवण घेवून गेला, पण पिराजी जागा नव्हता. मग सुनीलनही त्याला उठवलं नाही ... उद्या बघू या याचं काय दुखणं आहे ते... असं मनाशी ठरवून तो निघून गेला...

... ज्याला काळजी असते तो दिवसाची रात्र करतो आणि … रात्रीचा दिवसही...!!!

अनादिकालापासून काही शक्ति कुठं कुठं जागा (की दबा ?) धरून बसल्यात ते सांगता येत नाही, आणि ज्यांना ते माहीत होतं ते सांगण्याच्या परिस्थितीत रहात नाहीत... मग याच गोष्टींचा ती शक्ति फायदा घेत राहते. आणि त्या शक्ति चांगल्या असतील तर लोक त्यांचा फायदा घेतात आणि ....

... आजची रात्रही कुणाच्यातरी फायद्याचीच होणार आहे... पण कुणाच्या ...

... त्या शक्तिनं वेल हे एक माध्यम बनवलं होतं, तिला तिथून निघून जायचं नव्हतं... कारण काहीही असू शकतं ... त्या जागेचा, त्या झाडाचा, त्या वेलीचा किती वर्षांचा, युगांचा, कदाचित रक्ताच्या नात्यांचा काहीतरी संबंध असणार आहे, म्हणून तर झाड नेस्तनाबूत झाल्यानंतरही वेलीच्या रूपात ती शक्ति आताच्या काळात वावरत होती हे मात्र नक्की ...

... आणि ती वेळ आली ... घटका भरली ...!!!

वेलीना जीव असतो पण वाऱ्याच्या संबंधातून त्या हलतात, डोलतात... म्हणजे त्या वेलीना कुठलीतरी आणखी एक शक्तिच मदत करत असते ना... तशीच ही शक्ति आता या वेलीला मदत करतेय... जमिनीतून वर येण्यासाठी... आणि अगदी हळू हळू आपल्या सावजाकडे कानोसा घेत घेत जमिनीवरून सरपटतेय... वातावरणात तोच क्रूरतेचा, हिंसेचा दर्प पसरला होता... स्वतःचा जीव वाचवण्यासाठी दुसऱ्या कुणाचा तरी घ्यावा लागतो, या विश्वासातून तयार झालेला अहंकारी दर्प...!

... वेलीच्या बरोबर विरुद्ध बाजूला पाल होती आणि मध्ये दगड - विटांचे तुकडे, मातीचे ढिगारे पडले होते... त्यातून बरोब्बर वाट काढत ती वेल बेधडक चालली होती... दगडांच्या खाचांमधून, मातीच्या ढीगात बीळ करीत , पण हळू हळू हळू हळू .... आणि इकडे जमिनीखालून ती भराभर उगवतच चालली होती...

... पूर्ण प्लॉट तीनं ओलांडला आणि पिराजीच्या पालात ती शिरली ... अगदी हलकेच... मग त्याच्या बाजेच्या एका खांबावरून ती वेल त्याच्या शेजारी पोहोचली... आणि हळू हळू तिथं

गुंता व्हायला सुरुवात झाली ... थोड्याच वेळात पिराजीच्या तोंडावरती हिरवा, काळा, लाल – तपकिरी रंगाचा, माती – पानांनी भरलेला आणि फक्त हिंसेच्या दर्पात भिजलेला एक मोठा गुंता घोंगावत होता... हळू हळू ... फक्त संपूर्ण ताकदीची वाट पाहत...

... पिराजीच्या गालाला एका पानाचा स्पर्श झाला, त्यानं डोळे किलकिले केले आणि त्याला पानांच्या गोळ्याशिवाय काहीच दिसलं नाही... त्याला काय समजायचं ते तो समजला आणि अस्फुट शब्द त्याच्या तोंडातून बाहेर येण्याच्या आतच त्या गुंत्याने त्याच्या तोंडाचा कब्जा घेतला होता... त्याच्या बाजेवर काही क्षण अखेरची धडपड झाली, पण त्याचे हात-पाय आणि सारं अंग त्या वेलीनं जखडून ठेवल्यामुळं त्याला काहीच करता आलं नाही... अगदी तिसरा श्वासही घेता आलं नाही...

“सर्र्र्र्र्र्र सर्र्र्र्र्र्र सर्र्र्र्र्र्र ..... सर्र्र्र्र्र्र सर्र्र्र्र्र्र सर्र्र्र्र्र्र....” वेलीचा गुंता पिराजीचे शरीर घेवून जमिनीवरून एक हात अंतर वरती लोंबकळत चालला होता, पण त्या गुंत्यातून त्याचा हात बाहेर जमिनीवर घासत होता.... पण त्याचा आवाज जास्त वेळ कुणालाच आला नाही... रातकिड्यांच्या कर्कश आवाजात तो विरून गेला...

... तलावापाशी आल्यानंतर त्या मुक्त शरीराला पाण्यात फेकले गेले, अतिशय रागाने आणि पाशवी शक्तीने... आणि शक्य तितक्या लांब .... मग ती शक्ति वेलीच्या रूपातच आनंदित झाली आणि पानांची सळसळ करत पुन्हा आपल्या जागेवर जावून झोपली... काहीच झालं नसल्यासारखी...

...



# प्रकरण ७

सुनीलनं खूप शिव्या देत सकाळी पिराजीचा शोध घेतला, पण कुठल्यातरी शेजारच्या गावात गेला असेल डॉक्टरकडे, असं मनाला समजावून बाकीच्या कामात सगळे गढून गेले... असे दोन-तीन दिवस झाले, नंदू ही गावाहून परत आला .... आणि पिराजीही .... पाण्यावर !!!

...

पोलिस केस, गावातल्या चर्चा यांचा सोक्षमोक्ष करायला मनोजला दोन-तीन महीने लागले. त्या काळात कामगार वेगळया कामावर निघून गेल्यामुळे पुन्हा सुनील आणि जीवबाची कामगारांची जोडणी व्हायला एक महिना लागला.

...

# प्रकरण ८

आता मनोजसाठी एक हॉल बांधून पूर्ण आहे, पण बाहेरच्या तटाचे काम अजुनी कुणी केले नाही !

...मनोज एका वीक-एंडला एकटाच कामाची पाहणी करण्यासाठी आणि निवांत वेळ काढण्यासाठी भिरेला प्लॉट वर आला. शनिवारी दुपारी प्लॉटचे बांधकाम आणि हॉलची पाहणी करून मनोजने निवांत डुलकी काढायचं ठरवलं..

... त्याने डोळे उघडले तेव्हा त्याला पहिल्यांदा कोवळया वेलींच्या पानाव्यतिरिक्त काही वासच येत नव्हता. फक्त सळसळण्याचा आवाज येत होता ... त्यानं सभोवार पाहिलं तर त्याला त्या हॉलमध्ये सगळीकडे वेलीच्या पानांनी भिंतींवर कब्जा केला आहे की काय असं वाटलं... फक्त भिंतींवरच नव्हे तर छतावर, खिडक्यांवर, दारांवर, जमिनीवरदेखील.... आणि या कॉटवर मात्र ती वेल आलेली नाही अजुनी.... असं त्याला वाटतय तो पर्यन्त जमिनीवरच्या वेलीनी त्या कॉटच्या चारही पायांना धरून वाढायला सुरुवात केली...त्याला कुठतरी पळत निघून जावं असं वाटलं... पण तो काहीच करू शकत नव्हता...कारण जायचं असेल तर अंगातली शक्ति तरी सहाय्य करायला हवी, पण ती शक्तिच आता पूर्ण गाळठुण गेली होती ... त्याला सगळीकडं फक्त सळसळण्याचा आवाज येत होता आणि त्याचे डोळे जिथे जटिल तिथपर्यंत फक्त वेळ आणि वेलच नजरेत भरली होती...आणि लाल-काळया मातीतून उगवलेल्या या वेली सर्वत्र वाढत होत्या... पूर्ण ताकदिनिशी ... झर झर झर झर....

... मग त्या वेलींच्या पानांनी त्याच्या पायाला घट्ट धरून हलवायला सुरुवात केली ... आणि अचानक त्या वेलीनी त्याला हाक मारल्यासारखं वाटलं ..."साहेब... ओ साहेब...."

... मनोजचे डोळे खूप जड झाले होते...पण कितीतरी ताकद लावली तरी उघडणार नाहीत असं त्याला वाटत होतं ... पण ते उघडले तेव्हा सुनील त्याला जागं करण्याचा प्रयत्न करत

होता... आणि त्याचं शरीर मात्र घामानं चिंब भिजलं होतं ... आणि आजूबाजूला वेलीच्या पानांचा मागमुसही नव्हता... हुश्श! स्वप्न ... !!

... तो संध्याकाळी भिरा पॉवर प्लांट पर्यन्त चक्कर टाकून आला, आणि येताना सहजच त्याचे लक्ष अपुऱ्या तटा कडे गेले आणि त्याने जीवबाला हाक मारली. त्याला तट लवकरात लवकर पूर्ण करायचा आहे याची आठवण करून तो हॉलमध्ये निघून गेला...

... रविवारची सुट्टी असल्याने सगळे कामगार शनिवारी थोडे लवकरच निघून गेले होते. सुनील आणि शेवंता काही कार्यक्रमासाठी तिच्या माहेरी गेले होते...जीवबा एकटाच बाहेरच्या पालात बिनघोर झोपला होता आणि मनोज एकटाच बराच वेळ रात्रीच्या नीरव शांततेचा अनुभव घेत, पुस्तक वाचत बराच वेळ हॉल बाहेरच्या व्हरांड्यात येरझारा घालत होता... मधेच कधीतरी रातकीड्यांचा आवाज ऐकत शांत बसून रहायचा... किंवा मोकळ्या आकाशातील चांदण्यांचा पिछा करायचा... मुक्त मुक्त मुक्त असं त्याला वाटत होतं पण मनाच्या एका कोपऱ्यात अंजली इथं हा अनुभव घ्यायला हवी होती, असाही त्याला वाटत होतं....

...अनावर झोप त्याला कधी आली आणि तो आतमध्ये ठेवलेल्या कॉटवर कधी जावून पडला त्यालाच कळलं नाही...

... कधीतरी रात्री, त्यानं डोळे उघडले तेव्हा त्याला दुपारचंच स्वप्न पडलं आहे असं वाटलं... तीच वेलिंची सळसळ, पूर्ण हॉल भर ... दारांवर ... भिंतींवर ... खिडक्यांवर ... जमिनीवर ... आणि आता आपल्या कॉट वर देखील ... कुठही त्या थांबत नाही आहेत... कोणतीतरी ताकद त्यांना वाढवतेय असं त्याला वाटत होतं ...

...पूर्ण हॉल मध्ये पसरल्यानंतर त्याच्या कॉट वर त्या झेपावल्या आहेत... अच्छा, म्हणजे आपल्याला आज दुपारचं स्वप्न पुन्हा पडलं आहे, असं वाटून त्यानं दुसऱ्या कुशीवर वळण्याचा प्रयत्न केला ... पण त्याला आपला हात तिथून उचलताच आला नाही... कारण नुकत्याच तिथं सरसावलेल्या वेलीनी त्याचा हात जखडून ठेवला होता... मग दूसरा हात... मग दोन्ही पाय .... आणि आता काय .... चेतनामय जीव आणि शक्तींनी भारलेला जीव यातला संघर्ष ... ???

... हे, हे स्वप्न संपत का नाही ... अजून का मी यातून बाहेर पडत नाही .... त्यानं हात, पाय पूर्ण ताकद लावून हलवण्याचा प्रयत्न सुरू केला... त्याच्या बारीक उघडलेल्या डोळ्यातून त्यानं तो हॉल मध्ये पसरलेला वेलींचा उग्र दर्प असणारा जंगली गुंताही पाहिला होता... एका जागी स्थिर असणाऱ्या सजीव वस्तु कुठलीतरी चेतना धारण केल्यानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे वागतात... आणि हे बघितल्यानंतर बुद्धीमान सजीव देखील गर्भगळीत होतात, तशीच मनोजची आता अवस्था झाली आहे... आणि आता तो दर्प त्याच्या नाकाजवळ झोंबू

लागला... आणखी जवळ ... आणखी जवळ ... आणि आता एकदम लवलवणाऱ्या वेलींच्या पानांचा स्पर्श आणि तो दर्प त्याला एकदम जाणवला... त्याच्या कॉट वर आता वेलीची वाढ पूर्ण झाली होती... तिथं मनोज नव्हताच ... होता तो फक्त गुंता... सळसळणारा ... क्रूर .. त्याच्या गळ्याभोवती नाजुक वेलींचा फास आवळत चालला होता... तेवढ्यात कुठल्यातरी आंतरिक शक्तींनी एकत्र येवून त्याच्या गळयातून उंच आवाजात स्वर काढला... आणि तो जीवबा पर्यन्त गेला...

... दोन क्षण वेलिंची सळसळ थांबली... काहीतरी कुणीतरी ठरवत आहे अशी शांतता पसरली... कुणीतरी कानोसा घेत होतं, कुणीतरी खिडकीतून बाहेर पाहत होतं ... जीवबा आवाजाच्या दिशेनं काठी घेवून भरभरा येत होता... सळसळ वाढली ... शक्ति वाढली ...

... आणि जीवबाला त्यांनी दारातच घोळात घेतलं ... त्याला काही समजायच्या आतच त्याला वेलीनी तिथच गुंडाळायला सुरुवात केली...

त्याचा आवाजही कुणाला ऐकू आला नाही ... पण मनोजच्या अंगावरच्या वेलिंची ताकद जीवबाकडे आकर्षित झाली आणि मनोज थोडीतरी हालचाल करू शकला ... पण त्याला कॉट वरून उठून बाहेर पळण्यासाठी सुद्धा सगळी ताकद लावावी लागली कारण त्या वेलीनी त्याचा गळाही आवळून धरला होता...

... जीवबाच्या अचेतन शरीराचा गोळा करून त्या वेलीनी नंतर तो कुठे ठेवला , फेकला की जमिनीत खेचून घेतला ते कुणालाही माहीत नाही...

...दुसऱ्यादिवशी भिरेच्या बाजूला जाणाऱ्या रोडवर मनोज जेव्हा कुणालातरी दिसला तेव्हा तो पण असंबद्ध बडबड करीत रस्त्यावरच पडून होता ... मग नंतर त्याला गावातल्या दवाखान्यात नेवून वरवरचे उपचार केले ... कारण ही जखम, ही आठवण खूप खोलातली आहे...त्याचा असा वरवर उपचार करता येणं शक्यच नाही...

... कुणी म्हणतात, रात्री चोर-दरोडेखोर आले पण त्यांना काही मिळालं नाही म्हणून मनोजला असा जीवघेणा मार देवून ते पसार झाले ... पण जीवबाला त्यांनी का नेलं ह्याचं उत्तर कुणाकडेही नाही ... मनोजला माहीत आहे ... पण तो आता सांगणार नाही ... आणि सांगितलं तरी कुणाला ते पटणार नाही...

... शेवटी बाबांचे शब्द खरे ठरले “... सगळ्या गोष्टी काही डोळ्यांनी दिसत नाहीत आणि कानांनी ऐकता येत नाहीत...”

...

# प्रकरण ९...

... तो प्लॉट अंजलीनं आता विकायला काढला आहे ...

... आणि दूर एका डेस्कवर पुढच्याच महिन्यात मोबाइलची रिंग वाजली...

“हॅलो...”

“हॅलोSSS... ...”

“मि. किशोर बोलताय का?”

“हो, किशोर बोलतोय...”

“हां, मी आनंद बोलतोय, ... “

“कोण आनंद?”

“...आनंद सोंगटे हो, मागल्या आठवड्यात आला होता ना राव माझ्याकडं, तामहीणी साइडला, ... प्लॉट खरेदी करायचा होता तुम्हाला, काय विसरला का काय भाऊ?”

“अं .. हो हो आलं लक्षात... बोला आनंद भाऊ, जरा कामाच्या गडबडीत विसरून गेलो होतो एवढच...”

“बरं बरं, चालायचेच हे ... तुमचं काम येगळं आणि आमचं येगळं...!”

“... सांगा आता, आहे का एखादा प्लॉट तिथे?...आणि ...”

“...होय साहेब ...त्यासाठीच अगदी फक्त तुम्हालाच सांगायला फोन केला ... बाकी अजून कुणाला खबरच दिलेली नाही... तुम्हाला जसा पाहिजे होता तसा आहे... तामहीणी शेजारी, भिरा गावाजवळ ...समोर तळ्याचे पाणी आहे... भरपूर झाडं आहेत ...प्लोंट वर एक हॉल पण बांधून तयार आहे, फक्त येवून राहायचं काम करायचं, काय?...“

...



... This is not the end... Please write to esahity@gmail.com for the next part of the story

... हा शेवट नाही. पुढील प्रकरणांसाठी कृपया esahity@gmail.com शी संपर्क साधा

# ई साहित्य प्रतिष्ठान

**बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ**

मराठीत तुकोबा ज्ञानेश्वरांसारखे महान संतकवी होऊन गेले. पुलं , जीएं सारखे महान लेखक गेल्या शतकात होऊन गेले. या सार्‍यांबद्दल बोलताना लोक न भूतो न भविष्यती असे म्हणतात. पण आम्हाला हे पटत नाही. ज्ञानोबा तुकारामासारखे संत सहस्त्रकांतून होतात हे खरे. पण मराठीतली प्रतिभा आता आटली हे मात्र खरे नाही. आमचा विश्वास आहे की मराठीत आताही कुठे कुठे महान प्रतिभा जन्माला येत असेल आणि लोकाश्रयाच्या अभावी कोमेजूनही जात असेल. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गाभवनाची कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. हे वाल, वाटाणे, चवळी जर मातीत रुजवली तर त्यातून मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते असं मानतात. पण हा दाणा आपण भाजीत घालून खाल्ला की संपलं.

अशीच असते मानवी प्रतिभाही. मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. पण त्यांना योग्यवेळी माती पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही.

आणि असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना पुस्तकं मिळत नाहीत. परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही. अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली.

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकर्‍यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान

मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. "जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?

बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

**तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?**

**आपल्या खास 12 मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.**

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

www.esahity.com